## निशाणी क्र.५७ वरील आदेश

प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी प्रतिवादी क्र. १ हे मयत झाले असल्याने त्यांचे कायदेशीर प्रतिनिधी दाव्यामध्ये सामील करण्याबाबत दाखल केलेला आहे.

०२. वादीतर्फे अर्जात असे नमुद करण्यात आले की, प्रस्तुत दाव्यातील प्रतिवादी क्र. १ श्रीहरी शिवदास आदनाक हे दिनांक ०१/०१/२०२४ रोजी मयत झालेले आहेत. प्रस्तुत प्रकरणातील मयत प्रतिवादी क्र. १ हे प्रतिवादी क्र. २ व ३ यांचे वडील होते, प्रतिवादी क्र. १ च्या मृत्युनंतर प्रस्तुत प्रकरणातील प्रतिवादी क्र. २ व ३ यांच्या शिवाय १/१) सत्यभामा श्रीहरी आदनाक (मयताची पत्नी), १/२) सौ. मंगलाबाई महादेव जाधव (मयताची मुलगी),१/३) सौ. गोदावरी लिंबराज जाधव (मयताची मुलगी), १/४) सौ. अलका शहाजी शिंदे (मयताची मुलगी),१/५) छबुबाई उध्दव इंगोले (मयत), १/५/१) गणेश उध्दव इंगोले, १/५/२) ज्योती सतिष लाखे, १/५/३) गोकुळ उध्दव इंगोले असे वारस आहेत व त्यांच्या व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत, सबब प्रस्तुत प्रकरणात मयत प्रतिवादी क्र. १ चे प्रतिवादी क्र. २ व ३ शिवाय उर्वरित वारस अभिलेखावर घेण्याची व दाव्यात समाविष्ट करण्याची परवानगी देण्यात यावी अशी विनंती करण्यात आलेली आहे. प्रस्तुत अर्जास प्रतिवादीतर्फे म्हणणे दाखल करुन विरोध दर्शविणेत आलेला आहे. प्रतिवादीतर्फे असे नमुद करण्यात आले की, वादीने मयताचे वारस ९० दिवसांचे आत अभिलेखावर घेणे आवश्यक होते, परंतु वादीने वारस अभिलेखावर घेणेकामी अर्ज विलंबाने दाखल केलेला आहे, सबब वादीचा अर्ज नामंजुर करण्यात यावा अशी प्रतिवादीतर्फे विनंती करण्यात आलेली आहे.

०३. वादीतर्फे विद्वान विधिज्ञ ***श्री.एस.एल.घोगरे*** यांचा युक्तीवाद ऐकला. प्रतिवादीतर्फे विद्वान विधिज्ञ ***श्री.एल.एस. देशपांडे*** यांचा युक्तीवाद ऐकला.

**०४.** प्रस्तुत दावा हा मालकी जाहीर होउन निरंतर मनाई हुकुमाकरिता दाखल करण्यात आलेला आहे. एकंदरीत दाव्याचे स्वरुप, दाव्यातील वाद विचारात घेता दाव्यास असलेले कारण हे मयत प्रतिवादी क्र.१ चे कायदेशीर प्रतिनिधीविरुध्द देखील अस्तित्वात राहते. तेव्हा अशा परिस्थितीत दाव्यात योग्यप्रकारे, परिणामकारक निर्णय होण्याकरीता तसेच यदाकदाचित दाव्यात होणा–या हुकूमनाम्याच्या योग्य अंमलबजावणीकरीता मयत प्रतिवादीचे कायदेशीर प्रतिनिधी अभिलेखावर येणे न्यायाच्या दृष्टीकोनातून आवश्यक आहे. वादीतर्फे शपथेवर मयत प्रतिवादी क्र. १ श्रीहरी शिवदास आदनाक यांना वर नमुद हेच एकमेव कायदेशीर वारस असल्याचे नमूद करण्यात आलेले आहे व सदर कथन नाकारण्याचे कोणतेही कारण अभिलेखावर नाही.

**०५.** एकंदरीत दाव्याचे स्वरुप, वादी व प्रतिवादीमधील वादाचे स्वरुप, दावा स्थावर मिळकतीशी संबंधीत असल्याची बाब, तसेच दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश २२, नियम १,२ व ४ अन्वये प्रतिवादी क्र. १ श्रीहरी शिवदास आदनाक यांचे मृत्युपश्चात त्यांच्या कायदेशीर प्रतिनिधीविरुध्द दाव्याचे कारण अस्तित्वात राहत असल्याची बाब विचारात घेता, मयत प्रतिवादी क्र.१ चे कायदेशीर प्रतिनिधी अभिलेखावर येणे आवश्यक आहे. प्रस्तुत अर्ज दाखल करण्यास झालेला विलंब व यदाकदाचित झालेला अबेटमेंटचा आदेश याबाबतचे वादीचे अर्ज खर्चावर मंजूर करण्यात आलेले आहेत, सबब वर नमुद कारणांवरून न्यायहितार्थ प्रस्तुत अर्ज मंजूर करणे न्याययोग्य आहे. सबब मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आ दे श

| | |
|---|---|
| १) | निशाणी क्र.५७ वरील अर्ज मंजूर करणेत येत आहे. |
| २) | वादीस,मयत प्रतिवादी क्र. १ श्रीहरी शिवदास आदनाक यांचे अर्जात नमुद केल्याप्रमाणे कायदेशीर प्रतिनिधी अभिलेखावर घेणेची परवानगी देण्यात येते, वादीस दाव्यात त्या अनुषंगे दुरुस्ती करणेची देखील परवानगी देण्यात येते. वादीने प्रस्तुत दुरुस्ती ही पुढील तारखेपासून १४ दिवसांचे आत करावी व दुरुस्ती दाव्याच्या प्रती न्यायालयात तात्काळ दाखल कराव्यात. |
| | दावा येणेप्रमाणे पुढे चालेल. |

सही /-
(एम.बी.सोनटक्के),
दिनांक -२४/०७/२०२५ ३रे दिवाणी न्यायाधीश (व.स्तर),
अंबाजोगाई.